माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १४९७/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. प्रशांत शंकर नामनवार, पोलिस स्टेशन समोर, प्रभाग क्र. १४, मु.पो.ता. अहेरी, जि. गडचिरोली-४४२७०५ | पंचायत समिती कार्यालय, अहेरी, ता. अहेरी जि. गडचिरोली | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कार्यालय, अहेरी, ता. अहेरी जि. गडचिरोली |

**सुनावणी दिनांक :- १७.१२.२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **अनुपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित** | **उपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : १९.०५.२०२२

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०९.०६.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती पुरविण्यात आलेली नाही.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : संबंधित जन माहिती अधिकाऱ्यावर कलम २०(१) व (२) अन्वये शिस्तभंगाची व दंडाची कार्यवाही करत मला कलम १९(६) अन्वये २००००/- नुकसान भरपाई देण्यात यावे आणि आपल्या समक्ष संपुर्ण माहिती कलम ७(६) नुसार निशुल्क पुरविण्यात यावी जेणेकरुन माहिती मिळण्यास विलंब होणार नाही, अशी विनंती केलेली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०४.०३.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही.

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : तक्रार अर्ज दिल्यापासून जोडपत्र-अ प्राप्त तारखेपर्यंत

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : दिनांक १९.०१.२०२२ रोजी आपल्या कार्यालयात दिलेल्या तिन्ही तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा दैनंदिन संपुर्ण अद्यावत तपशिल मिळण्याबाबत.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

४. **प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ११.०४.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही.

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती पुरविण्यात आली नाही.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

५. **युक्तीवाद/लेखी खुलासा —**

आज सुनावणीत विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्री. वैभव एस. कविश्वर व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्रीमती के.व्ही. रामटेके आयोगासमोर उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, अपिलार्थी यांचा दिनांक ०४.०३.२०२२ रोजीचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झालेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देता आलेली नाही. तसेच अपिलार्थी यांनी माहिती अर्जात नमूद केलेले ३ तक्रार अर्ज हे व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेले नाही. त्यामुळे त्यांच्या माहितीचा विषय स्पष्ट होत नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील माहितीचा विषय स्पष्ट झाल्यास माहिती देता येईल, असे नमूद केले आहे.

६. **निष्कर्ष —**

१. सदर प्रकरणी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज हा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला नसल्यामुळे अपिलार्थीस माहिती देता आली नाही.

२. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, सदर माहिती अर्जात नमूद ३ तक्रार अर्ज हे व्दितीय अपील अर्जासोबत जोडण्यात आलेले नाही. त्यामुळे त्यांच्या माहितीचा विषय स्पष्ट होत नाही. तसेच आज अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीबाबतची स्पष्टता करु शकलेले नाही.

३. सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीतील विषय स्पष्ट होत नसल्यामुळे प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढणे क्रमप्राप्त ठरते.

**आदेश**

**वरील निष्कर्षावरुन प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★नागपूर★ सत्यमेव जयते

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १७.१२.२०२४**
जावक क्रमांक 1756 दिनांक 14 FEB 2025



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर